**B**

**CCE RR/PR/**
**NSR/NSPR**
**Reduced Syllabus**

# ಕರ್ನಾಟಕ ಶಾಲಾ ಪರೀಕ್ಷೆ ಮತ್ತು ಮೌಲ್ಯನಿರ್ಣಯ ಮಂಡಲಿ, ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು – 560 003

## KARNATAKA SCHOOL EXAMINATION AND ASSESSMENT BOARD, MALLESHWARAM, BENGALURU – 560 003

**ಜೂನ್ 2024 ರ ಪರೀಕ್ಷೆ - 2**

**JUNE 2024 EXAMINATION - 2**

## ಮಾದರಿ ಉತ್ತರಗಳು

## MODEL ANSWERS

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 08-M** **Code No. : 08-M**

## ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ — ಮರಾಠಿ

## Subject : First Language — MARATHI

(ಶಾಲಾ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಖಾಸಗಿ ಪುನರಾವರ್ತಿತ ಅಭ್ಯರ್ಥಿ / ಎನ್.ಎಸ್.ಆರ್. / ಎನ್.ಎಸ್.ಪಿ.ಆರ್.)
**(Regular Repeater / Private Repeater / NSR / NSPR)**

**ದಿನಾಂಕ : 14. 06. 2024 ]** **[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100**

**Date : 14. 06. 2024 ]** **[ Max. Marks : 100**

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **I.** | **पुढील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिलेले आहेत. त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा : 6 × 1 = 6** | |
| 1. | ‘निः + अक्षर’ याची संधी अशी होते<br>(अ) निक्षर (ब) नक्षर<br>(क) निरक्षर (ड) निरक्ष<br>**उत्तर :** (क) निरक्षर | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 2. | 'बाबा गावाहून आले.' अधोरेखित शब्दाची विभक्ती ही आहे<br>(अ) पंचमी (ब) तृतीया<br>(क) संबोधन (ड) षष्ठी<br>**उत्तर :** (अ) पंचमी | 1 |
| 3. | ''राणी बागेत फिरत होती.'' या वाक्यात हा काळ आहे<br>(अ) अपूर्ण वर्तमानकाळ (ब) पूर्ण भूतकाळ<br>(क) अपूर्ण भूतकाळ (ड) भविष्यकाळ<br>**उत्तर :** (क) अपूर्ण भूतकाळ | 1 |
| 4. | कर्त्याच्या लिंग, वचन, पुरुषाप्रमाणे क्रियापदाचे रूप बदलते तेव्हा हा प्रयोग होतो<br>(अ) कर्मणी प्रयोग (ब) भावे प्रयोग<br>(क) कर्तरी प्रयोग (ड) यापैकी नाही<br>**उत्तर :** (क) कर्तरी प्रयोग | 1 |
| 5. | ''नावडतीचे मीठ .............'' म्हण पूर्ण करा<br>(अ) कडू (ब) खारट<br>(क) आंबट (ड) अळणी<br>**उत्तर :** (ड) अळणी | 1 |
| 6. | 'आठवड्यातून एकदा प्रसिद्ध होणारे' ...............<br>(अ) दैनिक (ब) साप्ताहिक<br>(क) नियतकालिक (ड) वार्षिक<br>**उत्तर :** (ब) साप्ताहिक | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **II.** | **पहिल्या दोन पदांचा संबंध ओळखून तिसऱ्या पदाशी जुळणारा संबंधित शब्द लिहा :** **4 × 1 = 4** | |
| 7. | क्षणाक्षणाला : अव्ययीभाव :: राजवाडा : .................. <br> **उत्तर :** तत्पुरुष समास | 1 |
| 8. | भारत : नाम :: अबब ! : .................. <br> **उत्तर :** केवलप्रयोगी | 1 |
| 9. | चंद्र : सुधांशू :: धरित्री : .................. <br> **उत्तर :** पृथ्वी, इला, अचला, धरणी, धरा, भूमी | 1 |
| 10. | ज्ञान : अज्ञान :: स्तुती : .................. <br> **उत्तर :** निंदा | 1 |
| **III.** | **खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा :** **7 × 1 = 7** | |
| 11. | बोक्याने आपली एकादशी कशी मोडली ? <br> **उत्तर :** पोपटाला खाऊन | 1 |
| 12. | काकूंचा आकांत पाहून शेजारीपाजारी धावून का आले ? <br> **उत्तर :** लेखकांचा द्वितीय पुत्र राघू कैलासवासी झाला असे समजून | 1 |
| 13. | सावित्रीबाईंचे लग्न कोणाशी झाले ? <br> **उत्तर :** पुण्याच्या फुल्यांच्या मुलांशी ( जोतीबा फुले ) | 1 |
| 14. | रूक्मिणीने कोणास विन्मुख पाठवले नाही ? <br> **उत्तर :** कोणत्याही याचकास | 1 |
| 15. | रूक्मिणीने पती म्हणून कोणास वरले आहे ? <br> **उत्तर :** श्रीकृष्णाला | 1 |
| 16. | संत तुकडोजी यांचे पूर्ण नाव लिहा. <br> **उत्तर :** माणिक बंडोजी ठाकूर | 1 |
| 17. | सत्कार कवितेचे मूल्य लिहा. <br> **उत्तर :** लढा, संघर्ष | 1 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **IV.** | **खालील प्रश्नांची सूचनेप्रमाणे उत्तरे लिहा : $3 \times 2 = 6$** | |
| 18. | खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.<br>(अ) कोंडमारा होणे<br>(ब) हेटाळणी करणे.<br>**उत्तर :** (अ) कोंडमारा होणे – उघडपणे सांगता न येणे 1<br>(ब) हेटाळणी करणे – तिरस्कार करणे 1<br>( मूळ वाक्प्रचाराचा वाक्यात उपयोग व्हावा, अर्थाचा नव्हे ) | 2 |
| 19. | अलंकार ओळखून लक्षणे लिहा.<br>''चल ऊठ रे मुकुंदा, झाली पहाट झाली,<br>बाहेर चांदण्याला हलकेच जाग आली.''<br>**उत्तर :** **यमक अलंकार** 1<br>**लक्षणे –** कवितेच्या चरणात एखादे अक्षर ठराविक ठिकाणी आल्याने भाषेला सौंदर्य प्राप्त होते. 1 | 2 |
| 20. | गण पाडून वृत्त ओळखा.<br>युगामागुनी चालली रे युगे ही.<br>**उत्तर :** युगामा गुनीचा ललीरे युगेही<br>U – – U – – U – – U – – 1<br>य य य य<br>लक्षणे – अक्षरसंख्या – 12<br>गण – य, य, य, य 1<br>वृत्त – भुजंगप्रयात | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **V.** | **खालील प्रश्नांची उत्तरे दोन ते तीन वाक्यात लिहा :** **7 × 2 = 14** | |
| 21. | डॉ० बाबासाहेब आंबेडकर यांचा परिचय लिहा.<br>**उत्तर :** डॉ० बाबासाहेब आंबेडकर – भारताच्या पहिल्या मंत्री मंडळात कायदेमंत्री, भारतीय घटनेचे शिल्पकार, 'भारत रत्न' पुरस्काराने सन्मानीत. अनेक पुस्तकांचे लेखन. | 2 |
| 22. | मुलांनी 'आजीबाई' म्हणून हाक मारताच काकू रागाने काय म्हणाल्या ?<br>**उत्तर :** ''काय बाई, चावट पोरं आहेत ही ? मी काय म्हातारी–बितारी आहे, आजीबाई म्हणून घ्यायला ? मला काकू म्हणत जा पण जर का आजीबाई म्हटलंत तर जळता निखारा लावीन जिभेला.'' | 2 |
| 23. | ''म्या तरी गुत्तं घेतलंय का ?'' संदर्भासह अर्थ स्पष्ट करा.<br>**उत्तर :** **संदर्भ :** पाठ – वाटणी<br>**लेखक** – रा. रं. बोराडे<br>**स्पष्टीकरण –** संपत्तीची वाटणी झाल्यावर आईवडीलांची वाटणी होते. पण तात्यांची धाकटी सून सासूबाईंना सांभाळायला तयार नव्हती. त्यावेळी मोठ्या सुनेने हे वाक्य म्हटले आहे. | 2 |
| 24. | गंगूबाईनी आपल्या गुरुंना कोणती गुरुदक्षिणा दिली ?<br>**उत्तर :** आपली मुलगी कृष्णा हिला शिकवण्याची विनंती केली. त्याची 50 रु० फी सुद्धा दिली. व राहण्यासाठी फुकट घर दिले. | 2 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 25. | विरहिणी म्हणजे काय ? तुमच्या पाठ्यपुस्तकातील विरहिणीचे नाव लिहा.<br>**उत्तर :** विरहिणी – परमेश्वराच्या विरहाने आर्त झालेल्या भक्ताच्या अवस्थेचे वर्णन असणारी रचना<br>पैल तो गे काऊ कोकताहे. | 2 |
| 26. | श्रीकृष्णाच्या प्राप्तीसाठी रूक्मिणीने काय-काय प्रयत्न केले आहेत ?<br>**उत्तर :** अनेक व्रते केली, नियम धरले, देव, गुरू आणि ब्राह्मणांची सतत पूजा केली. दारी आलेल्या कोणाही याचकास परत पाठविले नाही. | 2 |
| 27. | विंदा करंदीकर यांचा थोडक्यात परिचय लिहा.<br>**उत्तर :** गोविंद विनायक करंदीकर, ज्ञानपीठ पुरस्काराचे मानकरी, इंग्रजीचे प्राध्यापक, मृदगंध, धृपद, जातक, विरुपिका इ. काव्यसंग्रह, अनेक पुरस्कार प्राप्त कवी. | 2 |
| **VI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा :** **1 × 3 = 3** | |
| 28. | (अ) सुख पाहता जवापाडे / दुःख पर्वताएवढे.<br>**किंवा**<br>(ब) अती तेथे माती.<br>**उत्तर : कल्पना विस्ताराचे मुद्दे :**<br>i) कल्पनेचा शब्दशः अर्थ सांगणे 1<br>ii) उदाहरणे व स्पष्टीकरण $1\frac{1}{2}$<br>iii) तात्पर्य $\frac{1}{2}$ | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| VII. | **खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा :** **10 × 3 = 30** | |
| 29. | आंधळ्यांनी हत्तीचे वर्णन आपल्या शब्दात कसे केले आहे ?<br>**उत्तर :** ज्या आंधळ्याने हत्तीच्या ज्या अवयवाला स्पर्श केला त्याप्रमाणे हत्तीचे वर्णन केले. सोंड – मुसळासारखा, कान – सुपासारखा, पोट – कोथळ्यासारखा, पाय – खांबासारखा, शेपूट – खराट्यासारखे, पाठ – भिंतीसारखी इ. | 3 |
| 30. | विद्येसाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट सोसले ?<br>**उत्तर :** एकवेळ उपाशी राहून ते पुस्तक खरेदी करायचे. मुंबईत डिपार्टमेंटच्या खोलीत दहा फूट लांब, दहा फूट रूंद खोलीत आई – बाप भावंडे. एक पैशाच्या घासलेट तेलावर अभ्यास केला. उच्च शिक्षणासाठी इंग्लंडला गेले. 8 वर्षाच्या अभ्यासक्रम 2 वर्ष 3 महिन्यात पूर्ण केला. | 3 |
| 31. | टोकियोमधील क्लब पार्टीचे वर्णन करा.<br>**उत्तर :** पार्टी एका मोठ्या हॉटेलात होती. मध्यभागी मोठे टेबल. टेबलावर अनेक खाद्यपदार्थ अतिशय कलात्मक पद्धतीने मांडलेले होते. लाईट व कॅमेरे लावलेले होते. लेखिका, राजकारणी मंडळी, राजकन्या, सामाजिक कार्यकर्त्या अशा सर्व स्तरातील महिला उपस्थित होत्या. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 32. | 'मदर्स युनियन' संस्थेची माहिती लिहा.<br>**उत्तर :** तीन मजली इमारत पहिल्या मजल्यावर ऑफिस, दुसऱ्या मंजल्यावर पालकांची संस्था, तिसऱ्या मजल्यावर शिक्षकांच्या संघटनेचे ऑफिस, अध्यक्षा 70 - 75 वर्षाच्या होत्या. मुलांना आश्रय देण्याच्या हेतूने संस्थेची स्थापना. | 3 |
| 33. | गंगुबाईंनी कोणकोणत्या देशात आपल्या गाण्याची कीर्ती पसरविली ? त्यांना कोणकोणते पुरस्कार व उपाधी देण्यात आल्या ?<br>**उत्तर :** गंगूबाईनी नेपाळ, पाकिस्तान, अमेरिका, कॅनडा, फ्रान्स जर्मनी अशा विविध देशात आपल्या गाण्याची कीर्ती पसरवली.<br>गंगूबाईना पद्मविभूषण, पद्मभूषण तानसेन पुरस्कार, माणिकरत्न, कर्नाटक भूषण, गोदावरी पुरस्कार व संगीत सरस्वती, संगीत सम्राज्ञी, भारतीय कंठ इ. उपाधी. | 3 |
| 34. | धर्माच्या नावाखाली ढोंगी गुरु काय-काय करतात ?<br>**उत्तर :** काही साधू धर्माच्या नावाखाली ढोंग माजवतात. अंगावर भगवी वस्त्रे धारण करतात, डोक्यावर लांब केस वाढवतात. मठामध्ये विविध गोष्टींचे आचरण करून भक्तीचे अवडंबर माजवतात, होमहवन करून अनेक गोष्टी वाया घालवतात, पशूंचा बळी देतात. इ. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 35. | पहाटेच्या वेळी बाळ्या आचंबित का झाला ?<br>**उत्तर :** बाळ्याने सकाळी पहाटे उठून पाहुण्यांना पाहिले. ते घरभर पसरलेले असतात. काल पाहुणे घरात नव्हते. व हे सर्वजण कोठून आले म्हणून बाळ्या अचंबित झाला. | 3 |
| 36. | देशातील सकलास मानवता कळू दे असे कवी का म्हणत आहे ?<br>**उत्तर :** स्वातंत्र्य पूर्व कालखंडा पासून आपल्या देशात अस्पृश्यता, उच्च नीच, श्रीमंत-गरीब असे भेदभाव आहेत. ते नष्ट व्हावेत. सर्वजण गुण्यागोविंदाने, एकमताने नांदोत, हिन्दु, ख्रिश्चन, इस्लामी कोणीही असू दे या सर्वामध्ये मानवता राहू दे. मानवाने सर्व भेदभाव नष्ट करुन मानवता हाच सर्वश्रेष्ठ धर्म आहे हे कळले पाहिजे. | 3 |
| 37. | कवितेतील स्त्री काय बांधत आहे ? ते बांधत असताना तिने कोणते कष्ट सोसले ?<br>**उत्तर :** कवितेतील स्त्री धरणाच्या बांधकामावर मोल-मजुरी करते. धरण बांधत आहे.<br>ती सकाळी लवकर उठते दळण्यासाठी धान्य नसल्याने ती कणीकोंडा शिजवते. स्वतःच्या बाळाला टोपलीखाली झाकून ती कामाला जाते. भर उन्हात कष्ट करते. | 3 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
| --- | --- | --- |
| 38. | 'पाठ आणि पोट यांचा झाला टाळ' कवितेचा सारांश लिहा.<br>**उत्तर :** कवी विंदा करंदीकर यानी भूक किती विदारक असते याचे वर्णन या कवितेत केले आहे. भुकेलेले जीव आपली भूक भागविण्यासाठी परमेश्वराने भाकरी होऊन यावे अशी विनवणी करतात, अन्नासाठी आम्ही सैरावैरा धावू वेळ प्रसंगी एकमेकाला खावू असे सांगतात. शेवटी परमेश्वरालाच ती इशारा देतात. आम्हाला अन्न मिळाले नाही तर तुझ्या डोक्यावर आम्ही घणाचे घाव घालू. अभंगाचे बळ अमर्याद असल्यामुळे परमेश्वर आपली भूक भागवेल अशी आशा आहे. | 3 |
| **VIII.** | **खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा : 4 × 4 = 16** | |
| 39. | शेवटी गणातात्यांनी कोणता निर्धार व्यक्त केला ? का ?<br>**उत्तर :** गणातात्यांनी आपली तिसरी वाटणी मागितली, तेव्हा दोघा भावंडे व त्यांच्या बायकांतून गणातात्या व त्यांची पत्नी कोणाकडे राहावीत यावरुन वाद झाला. त्यांच्या मुलांनी आई एकाकडे, गणातात्या एकाकडे राहावयाचा निर्णय घेतला. आई आजारी गणातात्या कामासाठी यावरुन पुन्हा वाद होऊन मुलांनी आईवडिलाच्या वाटण्या केल्या. हे पाहून गणातात्या म्हणाले, 'आमाला नाटणी नगं का दोन जागी दोगांनी ऱ्हानं नगं आमी नवरा – बायकू एक जागीच ऱ्हानार हाय.' 'द्यावी वाटली तर सालाची आडसीरी द्यावी, न्हायतर खाऊ मोलमजुरी करुन.' असा निर्धार केला. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 40. | सावित्रीबाई खऱ्या अर्थाने सहधर्मचारिणी कशा होत्या ते तुमच्या शब्दात लिहा.<br><br>**किंवा**<br><br>पतीच्या मृत्यूनंतर त्यांच्या कोणकोणत्या आठवणीनी सावित्रीबाईंना हुंदके येत होते ?<br><br>**उत्तर :** महात्मा फुलेनी सुरु केलेल्या प्रत्येक समाज कार्यात अर्थात शाळा सुरु करणे, पिण्याच्या पाण्याचा हौद, सत्यशोधक समाज, शुद्रांचे बोर्डींग, बालहत्या प्रतिबंध गृह या कामात पूर्णतः सहकार्य केले. सावित्रीबाईंचे सहकार्य मिळाले म्हणूनच फुले सामाजिक कार्य करू शकले. म्हणून खऱ्या सहधर्मचारिणी.<br><br>**किंवा**<br><br>महात्मा फुलेंच्या मृत्यूनंतर भरपूर वाद चिघळला. त्यांचे भाऊबंद हट्टाला पेटले होते. सावित्रीबाई स्वतः उठल्या व टिटवं उचलून चालू लागल्या. त्यावेळी त्यांना त्याचं शिकवण, सुरु केलेली शाळा, काशीचा पोरगा यशवंता, पिण्याचा पाण्याचा हौद, गुलामगिरी पुस्तक, शूद्रांच बोर्डिंग, बालहत्या प्रतिबंध गृह, मृत्यूपत्र इ. गोष्टी आठवत होत्या. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 41. | हिरव्या तृणपात्याचा सत्कार कुणी कुणी, कसा व का केला ?<br><br>**किंवा**<br><br>'सत्कार' या कवितेचा सारांश तुमच्या शब्दात थोडक्यात लिहा.<br><br>**उत्तर :** हिरव्या तृणपात्याच्या सत्कार सोहळयात पक्षी स्वागतगीत म्हणतात. ढग त्याला लवून मुजरा करतात. आणि वारा लाल मातीरूपी गुलाल उधळतो. हा सत्कार सोहळा अधिक आनंददायी व्हावा म्हणून दक्षिण उत्तर पावसाच्या सरीवर सरी कोसळतात. सर्वत्र मातीचा सुवास दरवळतो आणि मग शेवटी आठ दिशामधून जयजयकार घुमू लागतो.<br><br>**किंवा**<br><br>सत्कार कवितेत मंगेश पाडगावकरांनी सृष्टीमध्ये झालेल्या बदलांचे वर्णन केले आहे. पृथ्वीवर जीवसृष्टी निर्माण होईल याची शाश्वती नसतानाही एका लहानग्या तृणपात्याचा अंकुर पृथ्वीच्या पोटातून बाहेर येतो. त्याचे सर्वजण स्वागत करतात. पक्षी स्वागतगीत म्हणतात, वारा मातीरूपी गुलाल उधळतो, ढग मुजरा करतात दक्षिणोत्तर सरी कोसळतात इ. | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| 42. | खालील कवितेच्या ओळी पूर्ण करा :<br>या भारतात बंधुभाव ........................<br>..............................................<br>..............................................<br>............................. वा हो इस्लामी.<br>**किंवा**<br>सकलास......................................<br>................................................<br>................................................<br>.................................... हो आम्ही.<br>**उत्तर :** या भारतात बंधुभाव नित्य वसू दे वरचि असादे<br>हे सर्वपंथ संप्रदाय एक दिसू दे, मतभेद नसू दे<br>नांदोत सुखे अमीर गरीब एक मतानी<br>मग हिंदू असो ख्रिश्चन वा हो इस्लामी<br>**किंवा**<br>सकलास कळो मानवता राष्ट्रभावना<br>हो सर्वस्थळी मिळुनी समुदाय प्रार्थना<br>उद्योगी तरूण शीलवान येथे दिसू दे, दे वरचि असादे<br>जातिभाव विसरूनिया एक हो आम्ही | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| IX. | **खाली दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा : 1 × 4 = 4** | |
| 43. | आपल्या कामाची आखणी करणे, किती वेळात काय संपेल त्याचे नियोजन करणे आणि ठरविल्याप्रमाणे काम पार पाडण्याचा प्रयत्न करणे म्हणजे वक्तशीरपणा होय. औद्योगिकरण आणि शहरीकरण यामुळे आता तर जीवन खूप गतिमान व गुंतागुंतीचे बनले आहे. त्यामुळे सध्याच्या युगात वक्तशीरपणाला पर्याय नाही. वेळेस कामे पार पाडली नाहीत. तर आपण फक्त आपलेच नुकसान करतो असे नव्हे तर आपल्याबरोबर आपण इतरांचेही नुकसान करतो. म्हणून आपल्या कामाचे नियोजन करा. ती वेळच्या वेळी पार पाडण्याचा कसोशीने प्रयत्न करायला हवा. हाच 'वक्तशीरपणा' होय. वक्तशीरपणा न पाळणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेणे होय.<br>**प्रश्न :**<br>(अ) वक्तशीरपणा म्हणजे काय ? 2<br>(ब) कामाचे नियोजन का करावे ? 2<br>**उत्तर :**<br>(अ) आपल्या कामाची आखणी करणे, किती वेळात काम संपेल त्याचे नियोजन करणे आणि ठरविल्याप्रमाणे काम पार पाडण्याचा प्रयत्न करणे. 2<br>(ब) प्रत्येकाचे जीवन खूप गतीमान बनले आहे. वेळेत काम पार पाडले नाही तर आपण आपलेच नुकसान करतो. 2 | 4 |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **X.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा :** **1 × 5 = 5** | |
| 44. | आरोग्याचे महत्त्व पटवून देण्यासाठी लहान भावास मार्गदर्शन करणारे पत्र लिहा. | |
| | **किंवा** | |
| | सतत खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्यामुळे अभ्यासात व्यत्यय येत आहे. त्यासाठी हेस्कॉमच्या अधिकाऱ्यास तक्रार अर्ज लिहा. | |
| | **उत्तर : पत्रलेखन :** | |
| | i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा तारखेसह पत्ता) 1 | |
| | ii) मायना 1 | |
| | iii) विषय मांडणी व भाषा सजावट 2 | 5 |
| | iv) समारोप व स्वाक्षरी $\frac{1}{2}$ | |
| | v) कोणाला पत्र पाठवायचे त्याचा पत्ता. $\frac{1}{2}$ | |
| | **किंवा** | |
| | **पत्र :** | |
| | i) प्रेषक पत्ता (पाठविणाऱ्याचा तारखेसह पत्ता) 1 | |
| | ii) मायना (अधिकाऱ्याचा हुद्दा) 1 | |
| | iii) विषय $\frac{1}{2}$ | 5 |
| | iv) मजकूर 2 | |
| | v) सही व पत्ता. $\frac{1}{2}$ | |

| प्रश्न क्रमांक | अचूक उत्तरे | गुण |
|---|---|---|
| **XI.** | **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंध लेखन करा : 1 × 5 = 5** | |
| 45. | (अ) माझी आवडती महान स्त्री.<br>**किंवा**<br>(ब) पाणी टंचाई व त्यावरील उपाययोजना.<br>**उत्तर : निबंध लेखनाचे मुद्दे**<br>i) आकर्षक प्रारंभ 1<br>ii) विषय ज्ञान 2<br>iii) भाषा सौंदर्य 1<br>iv) शेवट. 1 | 5 |